श्री.राजेंद्र मोतीराम राठोड ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत भालगाव तालुका पाथर्डी यांचे अनाधिकृत गैरहजर असल्याने विभागीय चौकशी सुरु करणेकामी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नेमणूक करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/ २३९ /२०२५ १९८९०७९९
अहिल्यानगर,दिनांक - स्वाक्षरी खाली नमूद केलेप्रमाणे

संदर्भ :-१.या कार्यालयाकडील दोषारोप/ज्ञापन क्र. ग्रापं-३/ई क्रमांक-१०९२०९९ २०२५, दिनांक- ०७/०३/२०२५.

२.गटविकास अधिकारी पंचायत समिती,पाथर्डी यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/ १८५/२०२५, दिनांक ११/०४/२०२५ अन्वये श्री राठोड यांचा खुलासा. (प्राप्त दिनांक १७/०९/२०२५)

३.महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (६) (३)

<u>आदेश</u>

ज्याअर्थी,श्री.राजेंद्र मोतीराम राठोड ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत भालगाव तालुका पाथर्डी येथे कार्यरत असताना अनाधिकृत गैरहजर असल्याने त्यांचे विरुध्द संदर्भ क्र.१ अन्वये एकुण ०१ दोषारोप ठेवणेत आले होते. श्री.राठोड, यांनी संदर्भ क्र.२ नुसार दोषारोपांचा खुलासा सादर केलेला असुन त्यांचेवर ठेवण्यात आलेले आरोप क्र.०१ अमान्य केलेले आहेत. सदर दोषारोप प्रकरणी श्री.राजेंद्र मोतीराम राठोड यांना म्हणणे सादर करण्याची संधी देणे,न्याय हक्काचे दृष्टीने सर्व आरोपांबाबत विभागीय चौकशी करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ च्या तरतुदींनुसार श्री.राजेंद्र मोतीराम राठोड ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत भालगाव तालुका पाथर्डी यांचेवर ठेवण्यात आलेल्या ०१ दोषारोप संदर्भात खाते निहाय विभागीय चौकशी करण्याचे आदेश देण्यात येत आहेत.

त्याअर्थी या आदेशान्वये सदर विभागीय चौकशी करणे कामी चौकशी अधिकारी म्हणून सहा.आयुक्त (चौकशी),नाशिक विभाग नाशिक यांची व सादरकर्ता अधिकारी म्हणून जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचे वतीने श्री.देऊळगांवकर सुधीर दिगंबर,कनिष्ठ प्रशासन अधिकारी पंचायत समिती पाथर्डी यांची नियुक्ती करणेत येत आहे.

नियुक्त सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे. त्याच प्रमाणे श्री.राजेंद्र मोतीराम राठोड यांचे विरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपांचे आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची सक्षम प्रकारे बाजू मांडावी. विभागीय चौकशी वेळेत पुर्ण करणे कामी आवश्यक ते सर्व

कामकाज नियमाप्रमाणे करावे व होणा-या प्रत्येक सुनावणीस नियुक्त सादरकर्ता अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

विभागीय चौकशी प्रकरणी चे कामकाजात टाळाटाळ करण्याचे गैरवर्तन केल्याचे निदर्शनास आल्यास सादर कर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी. या खाते निहाय विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागू राहतील.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५१११४०६०७५३ असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 14-11-2025 15:15:39
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

सहा.आयुक्त, (चौकशी)
विभागीय आयुक्त कार्यालय,
नाशिक विभाग, नाशिक.

२/- सोबत श्री.राजेंद्र मोतीराम राठोड ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत भालगाव तालुका पाथर्डी यांचे अनाधिकृत गैरहजर पत्रव्यवहार संचिका या समवेत जोडली आहे. तरी चौकशी करुन अहवाल इकडेस सादर करावा.

प्रति,

श्री देवळाणकर एस.डी. कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पंचायत समिती पाथर्डी.
व्दारा:- गटविकास अधिकारी, पंचायत समिती पाथर्डी.

प्रत :- गटविकास अधिकारी, पंचायत समिती पाथर्डी.

३/- सोबतचा आदेश सोबत श्री.राजेंद्र मोतीराम राठोड,ग्रामपंचायत अधिकारी यांना बजावून तो मिळालेबाबत दुय्यम प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घेऊन पोहोच या कार्यालयास सादर करावी.

प्रत :- निवड नस्ती.

(स्वाक्षरीत/-)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर